Circular Marathi

# मुंबई विद्यापीठ

## परिपत्रक

**क्र.मा.सं.वि.क/आयसीसी/२०२३-२४/ ३३६**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/ विभाग प्रमुख, सर. ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व सिंधुदुर्ग उपपरिसरांचे संचालक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघाव्दारे सातव्या वेतन आयोगातील शिक्षकेतर कर्मचारी वर्गाच्या प्रलंबित मागण्यांच्या पुर्ततेसाठी सहकार्य केलेल्या महाराष्ट्र कर्मचारी महासंघ व सेवक कृती समिती यांचा जाहीर सत्कार व मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघाची जाहीर सभा बुधवार दिनांक २१ जून, २०२३ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता मराठी भाषा भवन, विद्यानगरी येथे आयोजित करण्यात आली आहे.

तरी या परिपत्रकाव्दारे विद्यापीठातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, बुधवार दिनांक २१ जून, २०२३ रोजी ०४.०० वाजता मराठी भाषा भवन, विद्यानगरी येथे महाराष्ट्र कर्मचारी महासंघ व सेवक कृती समिती यांचा जाहीर सत्कार व मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघाच्या जाहीर सभेला उपस्थित राहण्यासाठी फोर्ट परिसरातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना दुपारी ०३.०० वाजता व विद्यानगरी परीसरातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना दुपारी ०३.४५ वाजता एखादी त्वरीत बाब असल्यास ती बाकी राहू नये, याची काळजी घेऊन विभागप्रमुखांच्या परवागीने कार्यालय सोडण्यास परवानगी देण्यात येत आहे.

सदर बाब सर्व संबंधित कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिनस्त अधिकारी /कर्मचाऱ्यांना निदर्शनास आणून द्यावी.

20 जून, २०२३
मुंबई - ४०००३२

(प्रा.सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

...२/-